दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र |मंगळवार, 21 जुलै 2026 | अंक क्र. 76 |वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4




Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# चंद्रपूर, यवतमाळमधील प्रदूषणावरील उपाययोजनांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करा

## पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांचे निर्देश; केवळ चर्चेवर भर न देता कृतीवर भर

■ मुंबई : प्रतिनिधी

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोळसा खाणी व कोल वॉशरीजमुळे हवेची व पाण्याची गुणवत्ता घसरून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. केवळ चर्चेवर भर न देता, प्रत्यक्ष कृतीसाठी तीन टप्प्यांत कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रांत कार्यरत असलेल्या उद्योगपतींच्या शिष्टमंडळासोबत कोल वॉशरीज तसेच कोळसा खाणींमुळे होणाऱ्या प्रदूषणासंदर्भात मंत्री मुंडे यांनी मुंबईत बैठक घेतली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रदूषणाची सद्यःस्थिती, प्रदूषण होण्याची प्रमुख कारणे आणि त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांच्यासह चंद्रपूर व यवतमाळमधील कोळणा खाण व कोल वॉशरीज कंपन्यांचे अधिकारी, प्रतिनिधी तसेच चंद्रपूर विभागाचे विभाग समन्वयक डॉ विश्वजीत ठाकूर, प्र. वैज्ञानिक अधिकारी व इतर प्रदुषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





■ अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश ; चंद्रपूर परिसरातील प्रदूषण जास्तीत जास्त नियंत्रणात आणण्यासाठी उद्योगांना स्पष्ट व कडक निर्देश

चंद्रपूर परिसरातील प्रदूषण जास्तीत जास्त नियंत्रणात आणण्यासाठी उद्योगांना स्पष्ट व कडक निर्देश देत मंत्री मुंडे यांनी सांगितले की, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. कोळसा खाणी, कोल वॉशरीज आणि कोळशाच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण हे या परिसरातील प्रदूषणाचे प्रमुख स्रोत आहेत. विशेषतः कोळशाची वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याने भविष्यात रस्ते वाहतुकीऐवजी रेल्वे, कन्व्हेयर बेल्ट आणि झाकलेल्या कन्व्हेयर प्रणालीचा अधिक वापर करण्यावर भर देण्यात यावा.

कोळसा खाणी व कोल वॉशरीज उद्योगांनी अल्पकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा. येत्या तीन महिन्यांत कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत, त्याची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देशही मंत्री मुंडे यांनी यावेळी दिले. या आराखड्यात वृक्षारोपण, धूळ नियंत्रण, प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, परिसरातील जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाच्या कामांचा समावेश करण्यात यावा, अशी सूचना त्यांनी केली.

कोळसा खाणी आणि कोल वॉशरीजच्या परिसरात आवश्यक त्या ठिकाणी बफर झोन तयार करण्यात यावे. यामुळे प्रदूषणाचा परिसरातील नागरिकांवर होणारा परिणाम कमी करण्यास मदत होणार आहे. उद्योगांनी आपल्या परिसरातील पर्यावरणीय स्थिती सुधारण्यासाठी स्वतःची जबाबदारी निश्चित करावी, असेही मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले.

### अशा आहेत उपाय योजना

■ अल्पकालीन उपाययोजना : तात्काळ अंमलात आणता येतील अशी तंत्रज्ञाने, धुळीचे नियंत्रण, सायडिंग व वाहतूक व्यवस्थापन सुधारणे. मध्यमकालीन उपाययोजना : सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ईटीपी/एसटीपी), औष्णिक व रासायनिक कचरा व्यवस्थापन आणि हरित पट्ट्यांचा विस्तार. दीर्घकालीन उपाययोजना : शाश्वत तंत्रज्ञानाचा स्वीकार, स्वच्छ ऊर्जा स्रोतांचा वापर आणि 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' व कमीत कमी उत्सर्जनाकडे उद्योगांची वाटचाल.

उद्योगांनी त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (सीएसआर) उपयोग पर्यावरण संवर्धनासाठी करण्यावर भर देण्याबरोबरच परिसरातील गावांमध्ये पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, आरोग्य, शाळा, रस्ते तसेच अन्य आवश्यक मूलभूत सुविधांसाठीही त्याचा प्रभावी वापर करावा. शासनाच्या क्षेत्रातील आवश्यक पायाभूत सुविधांसाठी शासनाकडून कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे, याची माहिती संबंधित उद्योगांनी सादर करावी. शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्याचा औद्योगिक विकास महत्त्वाचा आहेच, पण त्यासोबतच नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे रक्षण ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. प्रदूषणावर जास्तीत जास्त नियंत्रण मिळवण्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांचे काटेकोर पालन करणे ही प्रत्येक उद्योगाची सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे उद्योगांनी संबंधित उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देशही पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

प्रदूषण कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना सुरू करण्यापूर्वीची स्थिती आणि उपाययोजनांनंतर झालेली सुधारणा यांची छायाचित्रे व इतर माहितीच्या माध्यमातून नोंद ठेवण्यात यावी. त्यामुळे प्रत्येक उपाययोजनांचा प्रत्यक्ष परिणाम तपासता येणार आहे, असेही यावेळी सुचविण्यात आले.

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या वतीने ४०० हेक्टर क्षेत्रावर सुमारे दोन लाख वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती डब्ल्यूसीएलच्या प्रतिनिधींनी बैठकीत दिली. सदस्य सचिव रेखावार यांनी सादरीकरणाद्वारे प्रदूषण रोखण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांची माहिती दिली.

# नाशिक रिंग रोड बाधित शेतकऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन तात्पुरते स्थगित; मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीचे आश्वासन

■ नाशिक वृत्तसंस्था

नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी छावा क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष श्री. करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज सहावा दिवस पूर्ण झाला.सरकारने अद्याप मागण्यांची दखल घेतली नसल्याच्या निषेधार्थ आज आंदोलनस्थळी सर्व शेतकऱ्यांनी काळे कपडे परिधान करून "काळा दिवस" पाळत तीव्र निषेध नोंदविला. शेतकऱ्यांच्या या एकजुटीमुळे व आंदोलनाच्या वाढत्या तीव्रतेची दखल घेत राज्याचे जलसंपदा मंत्री मा. श्री. गिरीश महाजन यांनी सायंकाळी सुमारे 6.00 वाजता आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलक शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी मा. गिरीश महाजन यांनी शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी व मागण्या समजून घेतल्या. त्यानंतर त्यांनी आंदोलनस्थळावरूनच मुख्यमंत्री कार्यालयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून दिनांक 21 किंवा 22 जुलै रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याबाबत चर्चा केली. या बैठकीत आंदोलकांच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून योग्य तो मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.



तसेच, "शेतकऱ्यांची घरे कोणत्याही परिस्थितीत वाचवली जातील," असे आश्वासन देत त्यांनी विशेषतः उपस्थित महिला शेतकऱ्यांनाही विश्वास दिला. या पार्श्वभूमीवर त्यांनी छावा क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष श्री. करण गायकर यांना अन्नत्याग आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. मा. गिरीश महाजन यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तसेच मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीचे आश्वासन आणि प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी सदरचे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

बैठकीनंतर मागण्यांबाबत काय निर्णय होतो, यावर पुढील भूमिका निश्चित करण्यात येणार आहे.यानंतर मा. गिरीश महाजन यांच्या हस्ते करण गायकर, गोकुळ लांबे, ज्ञानेश्वर वेगळे आणि विनोद कातड यांना ज्यूस पाजून अन्नत्याग आंदोलनाची सांगता करण्यात आली. सायंकाळी सुमारे 7.00 वाजता आंदोलन अधिकृतपणे तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी छावा क्रांतिवीर सेनेचे सर्व पदाधिकारी, रिंग रोड बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सप्तशृंगगड घाटात अपघाताची भीती; रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी

■ नाशिक वृत्तसंस्था



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंगी देवस्थान परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस आणि दाट धुके पडत असल्याने नांदुरी ते सप्तशृंग गड या १० किलोमीटरच्या घाटरस्त्यावर वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे घाटातील रस्त्यावर तातडीने रिफ्लेक्टर व दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी भाविक व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

### नागमोडी वळणांमुळे अपघाताचा धोका

घाटरस्त्यावर सध्या सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून, यापूर्वी बसविण्यात आलेले अनेक रिफ्लेक्टर काढले गेले किंवा रस्त्याखाली दाबले गेले आहेत. दाट धुक्यामुळे समोरील रस्ता दिसत नसल्याने वाहने रस्त्याच्या कडेला चिखलात अडकत आहेत. नागमोडी वळणांमुळे अपघाताचा धोका वाढला असून, विशेषतः रात्री वाहनचालकांना लाईटच्या सहाय्याने मार्ग शोधत प्रवास करावा लागत आहे.

घाटातील धोकादायक वळणांवर रिफ्लेक्टर व दिशादर्शक फलक नसल्याने, विशेषतः रात्री आणि दाट धुक्यात, नवीन भाविकांची दिशाभूल होते. पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने घाटरस्त्याच्या दोन्ही बाजूंना रिफ्लेक्टर तसेच आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक फलक तातडीने बसवावेत, अशी मागणी भाविक, ग्रामस्थ व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

### ...तर आंदोलन छेडणार

सप्तशृंग गडावर सध्या दाट धुके असल्यामुळे घाटातून वाहन चालविताना चालकांना, विशेषतः रात्री, रस्ता दिसत नाही. त्यामुळे वाहनचालकांची मोठी तारांबळ उडते. अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित घाटरस्त्याच्या दोन्ही बाजूंना रिफ्लेक्टर बसवावेत. अन्यथा आम्हाला आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही.

# सोनम वांगचुक व अभिजित दिपकेच्या समर्थनार्थ व शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजिनाम्यासाठी परळीत शैक्षणिक बंद

## तहसीलदारां मार्फत राष्ट्रपतींना दिले मागण्यांचे निवेदन

■ परळी प्रतिनिधी.

दिल्लीतील जंतर-मंतरवर देशातील हजारो विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उपोषणाला बसलेल्या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ , शिक्षणप्रेमी व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचूक व अभिजित दिपके यांना पाठिंबा देण्यासाठी परळीतील शिक्षणप्रेमी ,व सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने सोमवारी दिनांक 20 जुलै रोजी परळीत शैक्षणिक बंद पाळून केंद्र सरकारचा निषेध नोंदविण्यात आला आहे. तसेच परळी तहसीलदारां मार्फत राष्ट्रपतींना सर्वपक्षीय व शिक्षण प्रेमी परळीकर यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

शिक्षण व्यवस्थेतील बेबंदशाही, सतत नीट, टीईटी व स्पर्धा परीक्षांचे होणारे पेपर लिक होत असल्यामुळे करोडो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे .शिक्षण व्यवस्थेतील या गैरकारभाराची जबाबदारी घेऊन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन चालू आहे. आज दिल्लीत हजारो विद्यार्थ्यांनी संसदेला घेराव घालण्यासाठी संसदेच्या दिशेने निघालेले आहेत . या आंदोलनाला पाठिंबा तसेच केंद्र सरकारचा निषेध व्यक्त करीत शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या प्रमुख मागणीसाठी परळी शहरात शैक्षणिक बंद पाळण्यात आला.



### शैक्षणिक बंद यशस्वी करण्यासाठी

■ कॉ पांडुरंग राठोड, नारायण सातपुते,ॲड. प्रकाश मुंडे, मिलींद घाडगे, भोजराज पालीवाल,श्रीकांत मांडे, शिवाजी देशमुख, जगन्नाथ साळुंखे, गौतम आगळे,ॲड. श्रीनिवास मुंडे,मुक्ताराम गवळी,श्याम मुंडे, किरण सावजी, दत्ता दहिवाळ, श्रीकांत पाथरकर, प्रा. विलास रोडे, शंकर शेजुळ, रमेश चव्हाण, सय्यद एस. आय, अशोक कांबळे, प्रकाश चव्हाण, रानबा गायकवाड साई अकॅडमीचे चव्हाण सर , केशव मुंडे, बाळासाहेब गायकवाड विठ्ठलराव झिलमेवाड आदिंसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वनडे वर्ल्ड कपसोबत टी-20 चाही फॉरमॅट बदलला

■ मुंबई प्रतिनिधी



वर्ल्ड कप क्रिकेट स्पर्धेच्या स्वरुपात स्पर्धेगणिक बदल करण्याचे धोरण आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने कायम ठेवले आहे. वर्ल्ड कप वनडे स्पर्धा चार टप्प्यात करताना त्यात सुपर सेवन हा टप्पा घेण्याचे ठरले. त्याचवेळी टी-२० स्पर्धेत सुपर टेन टप्पा आणला आहे. वर्ल्ड कप वनडे स्पर्धा १४ संघांची होईल, तर टी-२० स्पर्धा वीस संघांची असेल. वर्ल्ड कप टी-२० स्पर्धेत एलिमिनेटर सामने होणार आहेत. त्यामुळे स्पर्धेच्या अंतिम टप्प्यातील लढतीत वाढ होणार आहे.



## निर्णय का घेतला ?

■ एकतर्फी आणि नवख्या संघांच्या सामन्यांना प्रतिसाद कमी लाभत असल्यामुळे या सामन्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे अंतिम टप्यात जास्त चुरस होईल आणि रंगत वाढेल. अंतिम टप्प्यातील एकतर्फी लढती कमी करण्यासाठीच हा निर्णय झाला आहे.

## टी-२०चा ढाचा



■ टी-२० स्पर्धेत २० सहभागी संघांची पाच गटांत विभागणी होईल. त्यातून अव्वल दहा संघ 'सुपर टेन' टप्प्यास - पात्र ठरतील. दोन गटांतील अव्वल संघ थेट उपांत्य फेरीत जातील. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावरील संघ उपांत्यपूर्व फेरीत खेळतील. उपांत्य आणि अंतिम फेरीच्या लढतींनी स्पर्धेची सांगता होईल.

## वर्ल्ड कप वन-डे स्पर्धेचे स्वरूप

■ २०२७ मधील स्पर्धेचे दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे, नामिबिया यजमान. पहिली फेरी त्यातील तळाचे मानांकन असलेल्या तीन संघांत पात्रता साखळी, त्यातील एक संघ प्राथमिक साखळीस पात्र.दुसरी फेरी (३० सामने) पात्र १२ संघांची दोन गटांत विभागणी. प्रत्येक गटातील सर्वोत्तम तीन संघांची आगेकूच. त्याचबरोबर दोन्ही गटांत मिळून चौथ्या क्रमांकावरील सर्वोत्तम संघासही संधी.तिसरी फेरी (सुपर सेवन २१ सामने) सात संघांत साखळी लढती. अव्वल चार संघ उपांत्य फेरीत बाद फेरीच्या लढती पहिल्या आणि चौथ्या क्रमांकाच्या तसेच दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या संघात उपांत्य लढती आणि त्यानंतर विजेतेपदाची लढत

## असा होईल टी-२० वर्ल्ड कप

■ २० संघांत होणारी स्पर्धा २०२८ मध्ये ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये.
■ प्राथमिक साखळी (३० सामने) २० संघांची पाच गटांत
■ विभागणी. यापूर्वी चार गटांत विभागणी होती. अव्वल दोन संघांची आगेकूच
■ सुपर टेन (२० लढती): दहा संघांची दोन गटांत विभागणी. गटविजेते उपांत्य फेरीस थेट पात्र
■ एलिमिनेटर सामने सुपर टेन गटातील दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचा संघ या टप्प्यास पात्र, त्यांच्यात क्रॉस सामने. विजेते संघ उपांत्य फेरीत बाद फेरीच्या लढती: एलिमिनेटरमधील विजेते आणि गटविजेते यांच्यात उपांत्य फेरीचे सामने. त्यानंतर विजेतेपदाची लढत.

# दुसऱ्या वनडेमध्ये भारताचा कॅप्टन बदलणार ?

■ मुंबई : प्रतिनिधी



भारत आणि इंग्लंड आज, गुरुवारी मालिकेतील दुसऱ्या वन-डे क्रिकेट सामन्यात आमनेसामने येत असून, भारतीय संघासमोर कर्णधार शुभमन गिलच्या तंदुरुस्तीची चिंता आहे. तीन सामन्यांच्या मालिकेतील सलग दुसरा सामना जिंकून भारतीय संघ मालिकाविजय निश्चित करणार का, याबाबत औत्सुक्य आहे. आजच्या सामन्याच्या वेळेत बदल असून हा सामना दुपारी वाजता होणार नाही. हा सामना कुठे आणि किती वाजता होणार आहे.

भारत आणि इंग्लंडमधील दुसरा सामना सोफिया गार्डन्स, कार्डिफ येथे पार पडणार आहे. हा सामना सायंकाळी ५.३० पासून सोनी स्पोर्टस आणि हॉटस्टारवर पाहता येणार आहे. ही खेळपट्टी फलंदाज आणि गोलंदाजांना प्रामुख्याने समान साथ देते. सुरुवातीस गोलंदाजांना जास्त साथ मिळते, सातत्याने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे चेंडू जास्त सीम होऊ शकतो. उत्तरार्धात फिरकी गोलंदाजांचा सामना काहीसा अवघड ठरू शकतो.

गेल्या सामन्यात भारतीय संघाने सहा विकेटनी बाजी मारली होती. या सामन्यात ८० धावांवर खेळत असताना कर्णधार गिलने पायातील वेदनांमुळे मैदान सोडले होते. त्याच्या पायात गोळे आले होते. हे फार गंभीर नसेल, अशी आशा आहे. दुसऱ्या सामन्यासाठी तो पूर्णपणे तंदुरुस्त असेल, अशी आशा आहे. कदाचित या सामन्यामध्ये तो विश्रांती घेऊ शकतो, त्यामुळे या सामन्यामध्ये श्रेयस कर्णधारपदाची जबाबदारी पार पाडेल. याशिवाय गेल्या सामन्यात लवकर परतलेल्या विराट कोहली (५ धावा) आणि रोहित शर्माच्या (११) कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल.

रोहित शर्मा अफगाणिविरूद्धच्या मालिकेत खेळला होता. तिथे त्याने दमदार कामगिरी केली होती. तर विरा कोहली हा दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. त्यामुळे या मालिकेतील उर्वरित दोन सामन्यांमध्ये धावा पाहण्यासाठी चाहते आतुरलेले आहेत. भारताला इंग्लंडविरुद्ध सलग चौथी ४ वन-डे मालिका जिंकण्याची संधी. २०२१पासून भारताने इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या तिन्ही वन-डे मालिका जिंकल्या आहेत. तर इंग्लंडविरुद्धच्या गेल्या सहाही वन-डे लढती भारताने जिंकल्या आहेत.

# अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी प्रदर्शित केलेल्या बॅनरमुळे वादाची ठिणगी

■ अटलांटा: प्रतिनिधी

फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत इंग्लंडवर २-१ ने विजय मिळवल्यानंतर अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी मैदानावर केलेला आनंदोत्सव वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सामना संपल्यानंतर मिडफिल्डर जिओवानी लो सेल्सो आणि बचावपटू निकोलस ओटामेंडी यांनी "लास माल्विनास सोन अर्जेंटिनास" (Las Malvinas son Argentinas) असे लिहिलेला एक बॅनर फडकवला. या घटनेमुळे अर्जेंटिनाला फिफाकडून शिस्तभंग कारवाईचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### वादाचे मूळ: 'लास माल्विनास' म्हणजे काय ?

'लास माल्विनास' हे अर्जेंटिनाने फॉकलंड बेटांसाठी वापरलेले नाव आहे. ही बेटे अर्जेंटिनाच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे ४८० किलोमीटर अंतरावर असलेला एक ब्रिटिश परदेशीय प्रदेश आहे. ब्रिटन आणि अर्जेंटिना यांच्यातील या बेटांच्या सार्वभौमत्वाचा वाद १९व्या शतकापासून सुरू आहे. १९८२ मध्ये या बेटांच्या ताबा मिळवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये ७४ दिवसांचे युद्ध झाले होते, ज्यामध्ये ६४९ अर्जेंटिनी सैनिक आणि २५५ ब्रिटिश सैनिकांचा मृत्यू झाला होता.

**फिफाचे कडक नियम काय आहेत ?**

फिफा आणि आंतरराष्ट्रीय फुटबॉल संघटना मंडळ (IFAB) यांच्या नियमांनुसार, सामन्यांदरम्यान खेळाडूंना कोणत्याही प्रकारचे राजकीय, धार्मिक किंवा वैयक्तिक संदेश, घोषणा किंवा चिन्हे प्रदर्शित करण्यास सक्त मनाई आहे.

**नियमावली:** नियमावलीनुसार, खेळाडूंच्या कपड्यांवर किंवा मैदानावरील कोणत्याही साधनावर राजकीय घोषणा नसाव्यात. अशा कोणत्याही उल्लंघनासाठी संबंधित खेळाडू किंवा संघावर फिफा दंड आकारू शकते.

**इतिहास:** २०१४ मध्येही, स्लोव्हेनियाविरुद्धच्या मैत्रीपूर्ण सामन्यापूर्वी असाच बॅनर प्रदर्शित केल्यामुळे अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनला २०,००० पाउंडचा दंड ठोठावण्यात आला होता.

**अर्जेंटिनाची अधिकृत भूमिका**

या घटनेनंतर, अर्जेंटिनाच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक अधिकृत विधान जारी करत फॉकलंड बेटांवरील देशाचा दावा पुन्हा एकदा ठामपणे मांडला आहे. उपराष्ट्रपती व्हिक्टोरिया व्हिलारुएल यांनी एक्स (X) वर पोस्ट करत म्हटले आहे की, "फॉकलँड्स अर्जेंटिनाचे आहेत! त्यांनी स्टेडियममध्ये येण्यास बंदी घातली असली तरी, ते आमच्या रक्तात आणि हृदयात आहेत."




# आयसीसी एकदिवसीय अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत अक्षर पटेल टॉप टेनमध्ये

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था



बर्मिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यातील प्रभावी कामगिरीबद्दल भारतीय अष्टपैलू क्रिकेटपटू अक्षर पटेलला (Axar Patel) ताज्या आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत पुरस्कार मिळाला आहे. शुभमन गिलदेखील (Shubman Gill) फलंदाजीच्या क्रमवारीत अव्वल स्थानाच्या जवळ पोहोचला आहे.

अक्षर पटेलने आयसीसी एकदिवसीय अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत तीन स्थानांची झेप घेत नववे स्थान पटकावले आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने चार बळी घेतले आणि ५२ चेंडूंमध्ये ५७ धावा केल्या, ज्यामुळे भारताला सहा गडी राखून विजय मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या कामगिरीमुळे अक्षर पटेल फलंदाजीच्या क्रमवारीत १८ स्थानांनी सुधारणा करत ७३ व्या स्थानावर पोहोचला आहे. गोलंदाजीच्या क्रमवारीतही त्याने दोन स्थानांची सुधारणा करत ४२ वे स्थान मिळवले आहे. इंग्लंडविरुद्ध २५९ धावांचे लक्ष्य गाठताना, (Indian Cricket) शुभमन गिलने ७५ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि एका षटकारासह ८० धावा केल्या आणि त्यानंतर तो दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला. या खेळीनंतर गिलचे रेटिंग १२ गुणांनी वाढले असून, तो आता एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या डॅरिल मिचेलपेक्षा केवळ ११ रेटिंग गुणांनी मागे आहे. आपल्या पुनरागमनाच्या सामन्यात एक बळी घेणारा जसप्रीत बुमराह गोलंदाजी क्रमवारीत २४ व्या स्थानावर पोहोचला आहे. नाबाद ५२ धावा करणारा वॉशिंग्टन सुंदर फलंदाजी क्रमवारीत २४ स्थानांनी झेप घेऊन १७७ व्या स्थानावर पोहोचला आहे. तसेच, अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीतही त्याने १६ स्थानांची सुधारणा करत ५५ वे स्थान पटकावले आहे.

# इंग्लंड विरुद्ध दोन असिस्ट करून इतिहास रचला

■ अटलांटा:

फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत इंग्लंडवर २-१ ने विजय मिळवल्यानंतर अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी मैदानावर केलेला आनंदोत्सव वादाच्या ...

अर्जेंटिनाने अटलांटामध्ये इंग्लंडला २-१ ने हरवून पुन्हा एकदा पुनरागमन केले आणि सलग दुसऱ्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. मेस्सीने इंग्लंडविरुद्ध गोल केला नाही, पण त्याने दोन असिस्ट्स दिले, ज्यामुळे गतविजेता अर्जेंटिना पुन्हा एकदा विजेतेपदाच्या जवळ पोहोचला. अर्जेंटिना ८५ व्या मिनिटापर्यंत पिछाडीवर होता, पण मेस्सीने संधी निर्माण करणे सुरूच ठेवले आणि इंग्लंडच्या बचावफळीने त्यांना रोखून धरले. मात्र, शेवटच्या क्षणी बाजी पलटली. या दोन असिस्ट्समुळे, मेस्सीने आता विश्वचषकाच्या इतिहासात १२ असिस्ट्स नोंदवून इतिहास रचला आहे.

### लिओनेल मेस्सीचा जागतिक विक्रम

लिओनेल मेस्सीच्या नावावर आता विश्वचषकाच्या इतिहासात १२ असिस्ट आणि २१ गोल आहेत. प्रत्येकी १० पेक्षा जास्त गोल आणि १० असिस्ट करणाऱ्या खेळाडूसाठी हा एक जागतिक विक्रम आहे. इतकेच नाही तर, २०२२ पासून, मेस्सीने सलग ११ विश्वचषक सामन्यांमध्ये एकतर गोल केला आहे किंवा असिस्ट केले आहे. गेल्या ६० वर्षांतील कोणत्याही खेळाडूने गोलमध्ये योगदान देण्याची ही सर्वात मोठी मालिका आहे.



इंग्लंडविरुद्ध दोन असिस्टसह, मेस्सीच्या नावावर आता विश्वचषकाच्या बाद फेरीतील १० असिस्ट झाले आहे त, जे (गेल्या ६० वर्षांतील) इतर कोणत्या ही खेळाडूंपेक्षा सहाने अधिक आहेत. मेस्सीने ३३ विश्वचषक सामन्यांमध्ये ३३ गोलमध्ये योगदान दिले आहे – २१ गोल आणि १२ असिस्ट.

### ७ मिनिटांत सामन्याचे चित्र पालटले

अटलांटा येथे झालेल्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्याच्या पहिल्या सत्रात दोन्ही संघांनी एकही गोल केला नाही. दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला ५५ व्या मिनिटाला अँथनी गॉर्डनने केलेल्या गोलमुळे इंग्लंडने आघाडी घेतली. ८५ मिनिटे पिछाडीवर राहिल्यानंतर आणि सतत दबाव टाकल्यानंतर, अर्जेंटिनाने एन्झो फर्नांडिसच्या गोलने पुनरागमन केले. स्टॉपेज टाइममध्ये लॉटारो मार्टिनेझच्या हेडरने २-१ अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या हाफमध्ये मेस्सीने १५ वेळा प्रतिस्पर्ध्यांकडे चेंडू गमावला, पण त्याने दोन असिस्ट देऊन त्याची भरपाई केली. सर्वप्रथम, ८५ व्या मिनिटाला एन्झो फर्नांडिसने मेस्सीच्या पासवर गोल केला. त्यानंतर, सात मिनिटांनी, ९२ व्या मिनिटाला बदली खेळाडू लॉटारो मार्टिनेझने मेस्सीच्या क्रॉसवर हेडरद्वारे गोल केला.

संपूर्ण सामन्यात अर्जेंटिनाकडे ६४% चेंडूचा ताबा होता, तर इंग्लंडकडे ३६% होता. अर्जेंटिनाने लक्ष्यावर सहा प्रयत्न केले, तर इंग्लंडने तीन. अर्जेंटिना आता न्यू जर्सीमध्ये अंतिम सामन्यात स्पेनचा सामना करेल.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सोनम वांगचूक समर्थनार्थ सिरसाळ्यात शेकडो विद्यार्थी : नागरिक उतरले रस्त्यावर!

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्याची निवेदना द्वारे मागणी : शैक्षणिक बंद ठेवत केला निषेध

**सिरसाळा | अतुल बडे**

सोनम वांगचूक समर्थनार्थ सिरसाळ्यात शेकडो विद्यार्थी - नागरिकांनी रस्त्यावरुन अंदोलन केले.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्याची निवेदना द्वारे मागणी अंदोलन कर्त्यांनी केली आहे. दिनांक २० रोजी वार सोमवार रोजी ईदगाह चौक ते डॉ. बाबासाहेब चौक मार्गे पोलीस स्टेशन पर्यंत हे अंदोलन करण्यात आले. सिरसाळा पोलीस स्टेशन येथे सह पोलीस निरिक्षक बाबा राठोड यांना मागण्यांचे निवेदन दिले. सिरसाळ्यातील शैक्षणिक अस्थापना बंद ठेवत तीव्र निषेध देखील वर्तवला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, निट पेपर फुटी प्रकरणी नैतिक जिम्मेदारी घेत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा हि मागणी घेऊन जागतिक दर्जाचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक हे दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात अंदोलन करत असतांना पोलीस प्रशासनाने त्यांच्यावर कार्यवाही करत जबरदस्तीने उचलून नेले. हा प्रकार अंदोलन दडपण्याचा असून लोकशाहीला मारक आहे .वांगचूक यांचे अंदोलन लोकशाही मार्गाने संविधानिक असून देशातील बरबटलेल्या शिक्षण व याला जबाबदार वेवस्था/सरकार यांच्या विरोधात आहे. निट परिक्षेचा पेपर फुटल्याने अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले तर त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. देशात सुमारे २० ते २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. एवढा गंभीर प्रकार घडला असतांना देखील याची कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नाही.खरे तर संबंधित शिक्षण विभागाच्या खात्याच्या ढिसाळ व दुर्लक्षित कारभारा मुळेच हि परिस्थिती निर्माण झाली. म्हणून नैतिक जिम्मेदारी स्विकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या शिक्षण मंत्री पदाचा राजीनामा देण्यात यावा अशी मागणी सिरसाळ्यात झालेल्या अंदोलनात अंदोलन कर्त्यांनी केली आहे. या अंदोलनाचे नियोजन/आयोजन सजग नागरिक समिती चे प्रा. उषा माने, उत्तम माने,कॉ बडे सर,राम किरवले , कपिल चोपडे,मन्ना काळे , अनिल जाधव , महादेव शेरकर , संभाजी आरसुळे, विजय झिंजूर्डे, अमोल किरवले यांनी केले होते.






**■ बीड जिल्ह्यातील सर्वाधिक आक्रमक व मोठे अंदोलन**

: सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ देशभरात अंदोलन झाले. याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यात देखील अनेक ठिकाणी अंदोलने झाली परंतु बीड च्या परळी तालुक्यातील सिरसाळ्यात मात्र अंदोलन मोठे व व्यापक झाले. अंदोलनात शेकडो विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले होते. अंदोलकात आक्रमकता दिसुन आली. प्रेरणा महाविद्यालय येथून पोलीस स्टेशन पर्यंत काढलेल्या रॅलीत तिरंगी ध्वज, महापुरुषांच्या प्रतिमा व सरकार विरोधात,शिक्षण मंत्र्या विरोधात घोषणा या मुळे सिरसाळ्यातील वातावरण ढवळून निघाले होते. नागरिकांचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसुन आला.

---

## मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त 22 जुलै रोजी चित्रकला स्पर्धा

**परळी वैजनाथ –** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस तसेच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत बुधवार, दि. 22 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता जिजामाता उद्यान, परळी वैजनाथ येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धा दोन गटांत होणार असून, पहिल्या गटात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'रंग भरण' स्पर्धा घेण्यात येणार आहे. तर दुसऱ्या गटात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण, जलसंवर्धन काळाची गरज, 'जल है तो कल है', स्मरणचित्र आणि पशुसंवर्धन या विषयांवर चित्रकला स्पर्धा होणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी ₹3,000, द्वितीय क्रमांकासाठी ₹3,000 आणि तृतीय क्रमांकासाठी ₹2,000 अशी रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.



या स्पर्धेत परळी शहर व परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन स्पर्धेचे आयोजक तथा भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टीत भव्य मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर

## लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली ६ व ७ ऑगस्टला मोफत आरोग्य तपासणी व उपचार ; पूर्वतयारी बैठकीत नियोजनाचा आढावा

**आष्टी | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली भव्य मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या यशस्वी नियोजनासाठी आज बीड येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजित आढावा बैठक उत्साहात पार पडली.

मुख्यमंत्री सहायता निधीचे राज्य समन्वयक डॉ. रितेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत शिबिराच्या नियोजनासह आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त नागरिकांना या महाआरोग्य शिबिराचा लाभ मिळावा, यासाठी विविध विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस लोकनेते आमदार सुरेश धस यांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे, भाजप विधानसभा अध्यक्ष गणेश नाना शिंदे तसेच पत्रकार प्रविण पोकळे उपस्थित होते. यावेळी शिबिराच्या आयोजनाची रूपरेषा, रुग्ण नोंदणी, विविध तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, तपासणी व्यवस्था, उपचार, शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची निवड तसेच मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचाराची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.







यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून शिबिर यशस्वी करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, प्रत्येक पात्र रुग्णापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

या महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ दि. २२ जुलै रोजी आष्टी येथे होणार असून, त्यानंतर दि. ६ व ७ ऑगस्ट रोजी आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी विनामूल्य (मोफत) मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये विविध आजारांची तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, आवश्यक औषधोपचार, पुढील उपचारासाठी संदर्भ तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या महाआरोग्य शिबिरामुळे आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघातील हजारो नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी व उपचारांचा लाभ मिळणार असल्याने या उपक्रमाबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

# अमानुष अत्याचार व हत्या प्रकरणातील खटला 'फास्ट ट्रॅक' कोर्टात चालवून आरोपींना तात्काळ फाशी द्या

## वर्धेचे पडसाद महागावात आदिवासी समाज आक्रमक

**महागाव | प्रतिनिधी**

समस्त आदिवासी समाजाच्या वतीने अत्यंत तीव्र संताप आणि दुःखद अंतःकरणाने हे निवेदन सादर करण्यात आले श्री. अनिल तरटे व सौ. छाया अनिल तरटे, रा. नगरवाडी, ता. महागाव, जि. यवतमाळ, ह.मु. अनिल पुरुषोत्तम कावळे यांचे मौजा रोठा शेतशिवारातील गोठ्यात, ता. जि. वर्धा येथे आपल्या कुटंबासह राहते. श्री. अनिल तरटे हे श्री. अनिल पुरुषोत्तम कावळे रा. वर्धा यांचे मौजा रोठा येथील शेतात मागील ०३ वर्षा पासुन सालगडी म्हणुन कामाला आहेत. मृतक मुलगी संध्या हिचे वय १२ वर्ष आहे. ती उच्च प्राथ. शाळा रोठा येथे ७ व्या वर्गात शिकत होती. अज्ञात इसमाने 12 वर्षीय अल्पवयीन मुलगी संध्या ही घरी एकटी असल्याचा फायदा घेऊन तिच्यावर जबरदस्तीने सामुहिक आत्याच्यार करून, तिच्या शरीराची छिन्नविछिन्न विटंबना करण्यात आली आणि दगडाने ठेचून तिची निघृण हत्या करण्यात आली. ही विकृत घटना केवळ एका कुटुंबावरील आघात नसून संपूर्ण मानवी समाजाला आव्हान देणारी आहे.

416421-72 सदर प्रकरणी सांवगी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येऊन भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये कलम १०३/१.६५/१,६६, ३३२ बाल लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४ व ६ नुसार अज्ञात व्यक्तींवर गुन्हे आले आहे. तसेच काही संशयीत आरोपींना अटक केल्याची माहिती आहे.

तरी या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींव्यतीरीक्त इतर आरोपींचा सहभाग आहे का? याबाबत चौकसी करून तात्काळ अटक करण्यात यावी.सर्व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा म्हणजे फाशीची शिक्षा देण्यात यावी. हे प्रकरण जलदगती (Fast-Track) न्यायालयात चालवण्यात येवून विनाविलंब निर्णय घोषित करण्यात यावा. पुणे प्रकरणाच्या धर्तीवर त्वरित कारवाई व्हावी: ज्याप्रमाणे पुणे येथील अत्याचार प्रकरणात प्रशासनाने कमालीची तत्परता दाखवून काही महिन्यांतच आरोपीला फाशीच्या खांबापर्यंत पोहोचवले, अगदी त्याच धर्तीवर याही प्रकरणाचे न्यायालयीन कामकाज दैनंदिन (Day-to-day) पद्धतीने चालवून कायदेशीर प्रक्रिया अत्यंत वेगाने पूर्ण केली जावी.सरकारने उच्च दर्जाचा वरीष्ठ विशेष सरकारी वकील या प्रकरणी नेमावा.या प्रकरणी आरोपींना तांत्रिक मुद्यांवर कोणतीही सूट मिळनार नाही या दृष्टिने पोलीस प्रशासनाचा चौकशी अहवाल तत्काळ न्यायालयात सादर व्हावा.पीडित कुटुंबाला आर्थिक व कायदेशीर साहाय्यः पीडित कुटुंब हे अत्यंत गरीब व आदिवासी समाजातील असल्याने त्यांना शासनाने त्वरीत पूनर्वसन करून शासनाच्या सर्व सोई सुविधा उपलब्ध करून तात्काळ आर्थिक मदत आणि कायदेशीर लढ्यासाठी सर्वोत्तम कायदेशीर साहाय्य पुरवण्यात यावे. पिडीत कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे.

या प्रकरणात दिरंगाई झाले तिव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा आदिवासी समाजाचे नेते देविदास मोहकर यांच्या नेतृत्वात




तहसीलवर धडकलेल्या समाज बांधवांनी निवेदनातून दिला यावेळी देविदास मोहकर (मा.जी.प.स),. नागोराव ढोबो (मो. सभापती),सीः पुंडलीक भुरके (कृ. उ. सेचात्मक),विठ्ठल बावस (ब्रिस्सा ब्रिगेड),राजेस तरसे (अ.भा. आ.वि.प.), तुकाराम भिके यांच्यासह समाज बांधवांच्या निवेदनावर सह्या आहेत.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार, 21 जुलै 2026

Last page




## गौरव भूमिपुत्राचा; अभिमान परळीचा!

# परळीच्या सुपुत्राचा राष्ट्रीय गौरव ; किरणकुमार गित्ते IAS यांच्या नागरिक सत्कारला उस्फूर्त प्रतिसाद

## भूमिपुत्राच्या यशाचा जल्लोष; आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते किरणकुमार गित्ते यांचा गौरव

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैजनाथच्या भूमीतून घडलेले आणि आज देशातील उल्लेखनीय सनदी अधिकाऱ्यांमध्ये मानाचे स्थान मिळविणारे आयएएस किरणकुमार गित्ते यांचा नागरी गौरव सोहळा रविवारी उत्साहात व दिमाखात पार पडला. त्रिपुरा राज्याच्या मुख्यमंत्री यांचे सचिव म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले आणि परळीकरांनी आपल्या भूमिपुत्राचा अभिमानाने गौरव केला. अल्पावधीतही प्रदीप खाडे यांच्या उत्कृष्ट नियोजनाची सर्वांकडून प्रशंसा

परळी वैजनाथचे भूमिपुत्र तथा त्रिपुरा केडरचे वरिष्ठ सनदी अधिकारी आयएएस किरणकुमार गित्ते यांची त्रिपुरा राज्याच्या मुख्यमंत्री यांचे सचिव (Secretary to the Chief Minister) म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल परळी शहरात रविवारी भव्य नागरी गौरव व सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते किरणकुमार गित्ते व त्यांच्या पत्नी सौ. उषाताई गित्ते यांचा मानाचा फेटा, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी औक्षण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. फटाक्यांच्या आतषबाजीने वातावरण उत्साहमय झाले. अल्पावधीत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असतानाही स्टेज, बैठक व्यवस्था, मान्यवरांचे स्वागत व संपूर्ण कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन हे आयोजक तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या केल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. धनंजय मुंडे म्हणाले, "किरणकुमार गित्ते यांच्या उत्तुंग कर्तृत्वाचा आम्हाला सदैव आनंद, गौरव आणि अभिमान आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलाने कठोर परिश्रम, जिद्द आणि गुणवत्तेच्या बळावर भारतीय प्रशासकीय सेवेत मानाचे स्थान मिळविले आहे. त्यांचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे." सत्काराला उत्तर देताना आयएएस किरणकुमार गित्ते म्हणाले, "परळीकरांनी दिलेले प्रेम, संस्कार आणि जडणघडण यामुळेच लोकसेवेचे कार्य माझ्या हातून घडत आहे. माझ्यावर दाखविलेल्या या प्रेमाबद्दल मी सर्वांचा मनापासून ऋणी आहे."




यानंतर परळी शहर व तालुक्यातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना, शैक्षणिक संस्था, पत्रकार, डॉक्टर, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या वतीने किरणकुमार गित्ते यांचा सत्काराचा अक्षरशः वर्षाव करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजीराव शिरसाट ,तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके, उपनगराध्यक्ष राजाखान, माजी उपनगराध्यक्ष शकील कुरेशी, डॉ. सूर्यकांत मुंडे, माजी सभापती भास्कर चाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, ॲड. गोविंद फड, दिनकर मुंडे गुरुजी, डॉ. सुरेश चौधरी, विजयकुमार वाकेकर, किशोर गित्ते, माधव मुंडे ,रामेश्वर महाराज कोकटे, नगरसेवक अनंत इंगळे, नगरसेवक हाजी बाबू, शंकर कापसे, अजय गित्ते, डॉ. दत्तात्रय गुट्टे, डॉ. बाळासाहेब कराड, डॉ. अजित केंद्रे, सुरेश टाक, समाधान मुंडे, विकास मुंडे, वैजनाथ कळसकर, कैलास तांदळे, श्रीकांत पाथरकर, रामेश्वर गुट्टे, दिलीप कराड, उद्धव आघाव , प्रा. तेजस तिडके, हरिष नागरगोजे, बंडू आघाव, अतुल दुबे, अनंत मुंडे सर, सौदागर कांदे, प्राचार्य श्रीकांत पाटील सर , यांच्यासह विविध क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील, प्राध्यापक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद केंद्रे यांनी केले, तर आभार सुरेश नाना फड यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला आणि परळीकरांनी आपल्या भूमिपुत्राच्या यशाचा अभिमानाने गौरव केला.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत आठवडाभर सामाजिक सेवा उपक्रमांचे आयोजन

**परळी वैजनाथ:**

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष, परळी शहराच्या वतीने दि. २२ ते २८ जुलै या कालावधीत विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजहिताला प्राधान्य देत नागरिकांसाठी उपयुक्त कार्यक्रमांची मालिका राबविण्यात येणार असून, या माध्यमातून ना. पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस सेवाभावी पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. नागरिकांनी या सेवा उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप शहराध्यक्षा सौ. उमाताई चंद्रकांतअप्पा समशेट्टे यांनी केले आहे.



कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, दि. २२ जुलै रोजी जिजामाता उद्यान येथे होणाऱ्या चित्रकला स्पर्धेने होणार आहे. स्पर्धा दोन गटांत होणार असून, इयत्ता ५ वी ते ७ वी विद्यार्थ्यांसाठी रंग भरण स्पर्धा तर इयत्ता ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण, जलसंवर्धन – काळाची गरज, जल है तो कल है, स्मरणचित्र व पशुसंवर्धन या विषयांवर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे आयोजन भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांनी केले आहे.

गुरुवार, दि. २३ जुलै रोजी वैद्यनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून, त्याचे आयोजन भाजपा अल्पसंख्याक मोर्चा शहराध्यक्ष शमी शेख व अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष राहुल घोबाळे यांनी केले आहे.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी शिवाजीनगर येथील आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचे संयोजन नगरसेवक अश्विनकुमार आघाव यांनी केले आहे.

शनिवार, दि. २५ जुलै रोजी विविध समाजोपयोगी उपक्रमांची रेलचेल असणार आहे. मारोती मंदिर, पद्मावती गल्ली येथे नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचे आयोजन नगरसेवक राहुल केंद्रे यांनी केले आहे. वैद्यनाथ प्रतिष्ठान येथे खिचडी-फराळ वाटप कार्यक्रम संदिपसेठ लाहोटी यांच्या पुढाकाराने होणार असून, त्याच ठिकाणी सर्वरोग निदान शिबिर मोहन जोशी व अनिष अग्रवाल यांच्या संयोजनातून आयोजित करण्यात आले आहे.

रविवार, दि. २६ जुलै रोजी धार्मिक, सामाजिक व सेवाभावी कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या दीर्घायुष्यासाठी श्री वैद्यनाथ मंदिरात अभिषेक, सुगंधकुटी बुद्धविहार, भीमनगर येथे बुद्धवंदना, हुसेन शाहवली दर्गा, बंगला गल्ली येथे चादर चढविणे, उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना व श्री वैद्यनाथ मंदिरातील भाविकांना फळ वाटप होणार आहे. श्रद्धानंद गुरुकुल येथे होमहवन व भोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांचे आयोजन प्रीतेश तोतला यांनी केले आहे.

मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात वृत्तपत्र वितरकांना पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट वाटप करण्यात येणार असून, या उपक्रमाचे आयोजन भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केले आहे.

पॉवरलूम सोसायटी येथे पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे व नगरसेविका डॉ. पूजा तोतला यांच्या वतीने होणार आहे. अन्नपूर्णा मातेची महाआरती व प्रसाद वितरण कार्यक्रम महिला व बालकल्याण सभापती सौ. अंजलीताई माळी-लोखंडे यांच्या आयोजनातून पार पडणार आहे.

सोमवार, दि. २७ जुलै रोजी वैद्यनाथ विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप कार्यक्रम भाजपा शहर उपाध्यक्ष महादेव इटके यांच्या आयोजनाखाली होईल. तसेच एसटी बस स्मार्टकार्ड व ज्येष्ठ नागरिकांना वॉकर वाटप कार्यक्रम नगरसेवक केशव नागरगोजे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. वैद्यनाथ मंदिर परिसर व भाजी बाजारात छत्री वाटप कार्यक्रम शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे व वैद्यनाथ बँक संचालक कुलभूषण जैन यांच्या पुढाकाराने होणार आहे. सरस्वती विद्यालयात शालेय साहित्य वाटप कार्यक्रम बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांच्या आयोजनाखाली होणार आहे.

या उपक्रमांची सांगता मंगळवार, दि. २८ जुलै रोजी होणाऱ्या भव्य मॅरेथॉन स्पर्धेने होणार असून, या स्पर्धेचे आयोजन दि. वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि. यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सर्व समाजोपयोगी उपक्रमांचा लाभ परळी शहरातील नागरिकांनी घ्यावा तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते, नगरसेवक, पदाधिकारी, विविध आघाड्या व मोर्चांचे पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथप्रमुख व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप परळी शहराध्यक्षा सौ. उमाताई चंद्रकांतअप्पा समशेट्टे यांनी केले आहे.

# जिजाऊ विद्यालय ही गुणवंत विद्यार्थी घडवणारी शाळा : गटशिक्षणाधिकारी मधुकरजी सुवर्णकार

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी त्यांचे कौतुक करून त्यांच्याशी संवाद करावा : अधिव्याख्याता डॉ.योगेशजी सुरवसे

## पालकांनी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली कौशल्य ओळखावे. - श्री विजय रापतवार (अध्यक्ष शिक्षक मैत्री प्रतिष्ठान)




**अंबाजोगाई |** शहरातील जिजाऊ विद्यालय या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष 2025- 26 मधील विविध स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा 18 जुलै रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अंबाजोगाई तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री मधुकर सुवर्णकार तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ.योगेश सुरवसे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विजय रापतवार उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रास्ताविकामध्ये संस्थेचे संचालक दयानंद लोंढाळ यांनी शाळेत राबवत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती देत स्पर्धा परीक्षेचे महत्त्व नमूद केले.

यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक डॉ योगेश सुरवसे यांनी उपस्थित पालकांना आपल्या मुला सोबत घरामध्ये जास्तीत जास्त संवाद साधा, त्यांच्या छोट्या छोट्या यशाची कौतुक करा, घरामध्ये आल्यानंतर प्रत्येकाने आपल्या मोबाईल साठी एक बॉक्स बनवून त्यामध्ये मोबाईल ठेवून द्या मुलां सोबत मनमोकळा संवाद साधा जेणेकरून मुले रोज शाळेत काय शिकवले काय अभ्यास दिला याविषयी तुमच्याशी संवाद साधतील यामुळे आपल्या मुलाची गुणवत्ता वाढवण्यासाठी या गोष्टी मदत करतील तसेच मुलांमध्ये मूल्य रुजविण्यासाठी या गोष्टी उपयुक्त ठरतील असे सांगितले.

शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विजय रापतवार यांनी पालकांनी आपल्या मुलाच्या अंगी असलेल्या विशेष कौशल्याचे निरीक्षण करून त्या कौशल्याला विकसित करण्यासाठी शिक्षकांच्या मदतीने प्रयत्न केले पाहिजे कारण आज प्रत्येक क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना करिअर करण्याची संधी आहे असे सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना गटशिक्षणाधिकारी श्री मधुकर सुवर्णकार यांनी जिजाऊ विद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या अंगी असलेल्या विविध क्षमता ओळखून अतिशय उत्तम रित्या शिक्षण दिले जाते त्यामुळे जिजाऊ शाळा हि गुणवंत विद्यार्थी घडवणारी शाळा होय असे गौरवोद्गार काढले.

यावेळी शाळेतील स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे गोल्ड मेडल,ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले तसेच यावेळी यांना स्पर्धा परीक्षेत क्रमांक मिळाला नाही त्यांच्या सुद्धा शाळेच्या वतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन पालकां समवेत गौरव करण्यात आला. यावेळी पालकांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका मोहिनी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.